# MARATHI (LL)

# MARATHI (LL)

## BOARD'S ACTIVITY SHEET (MARCH 2020)

**(With Solution)**

**Time : 3 Hours]** **[Total Marks : 80**

**सूचना :** *(1) सूचनांनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.*

*(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.*

*(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.*

*(4) विभाग 5 – उपयोजित लेखन प्र. 5. (अ) (2) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र. 1. (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावा.*

*(5) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.*

---

## विभाग 1 : गद्य

### पठित गद्य

**प्र. 1. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

**(1) कोण ते लिहा :** **2**

(i) नेहमी तिरके बोलणारे – -------------

(ii) बटाटा सोडण्याचा सल्ला देणारे – -------------

''दोन महिन्यात पन्नास पौंड वजन कमी करून दाखवीन तर खरा !'' अशी भीष्मप्रतिज्ञा करून मी आहारशास्त्रावरच्या पुस्तकात डोके घालू लागलो. प्रोटीनयुक्त पदार्थ, चरबीयुक्त द्रव्ये वगैरे शब्दांबद्दलची माझी आस्था वाढू लागली. साऱ्या ताटांतले पदार्थ मला न दिसता नुसत्या 'कॅलरीज' मला दिसू लागल्या आणि आनंदाची गोष्ट अशी की, वजन उतरवण्याच्या शास्त्रात पारंगत झालेले तज्ज्ञ मला रोज डझनवारीने भेटू लागले. इतकेच काय, परंतु ज्या आमच्या चाळीतल्या लोकांनी माझ्या उपासाची अवहेलना केली होती, त्यांनीच मला 'डाएटचा' सल्ला दिला. उदाहरणार्थ – सोकाजी त्रिलोकेकर.

''तुला सांगतो मी पंत, 'डाएट' कर. बटाटा सोड. बटाट्याचं नाव काढू नकोस.''

''हो ! 'म्हणजे कुठं राहता ?' म्हणून मला विचारलं तर नुसतं 'चाळीत राहतो' म्हणा. 'बटाट्याची चाळ' म्हणू नका. वजन वाढेल ! खी: खी: खी:!'' जनोबा रेगे या इसमाला काय म्हणावे हे मला कळत नाही. नेहमी तिरके बोलायचे म्हणजे काय! पण सोकाजींनी त्याला परस्पर जामून टाकले, ''ए इडिअट! सगळ्याच गोष्टींत जोक काय मारतोस नेहमी? मी सांगतो तुला पंत – तू बटाटा सोड.''

**(2) कृती पूर्ण करा :** 2

पंतांची आस्था वाढू लागलेले शब्द

| | |
|---|---|
| | |

**(3) पंतांना उपासाबाबत मिळालेल्या विविध सल्ल्यांचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.** 3

**प्र. 1. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

**(1) का ते लिहा :** 2

(i) डॉ. माशेलकर यांना माशेल हे गाव सोडावे लागले; कारण --------

(ii) 'शाळेत कसा जाऊ?' असा प्रश्न डॉ. माशेलकर यांच्यापुढे उभा राहिला; कारण --------

आमचे मूळ गाव दक्षिण गोव्यातील माशेल. माझे बालपण तिथेच गेले. माझे मामाही याच गावातले. तिथल्या एका मैदानावर खेळल्याच्या आणि पिंपळकट्ट्यावर बसून निवांतपणा अनुभवल्याच्या पुसटशा आठवणी माझ्या मनात अधूनमधून वाऱ्याच्या लहरीसारख्या येत असतात. माझ्या वयाच्या सहाव्या वर्षी माझे वडील वारले आणि आम्हांला उदरनिर्वाहासाठी आमचे माशेल हे गाव सोडावे लागले. मी आणि माझी आई मुंबईत येऊन पोहोचलो. गिरगावातल्या खेतवाडीतील देशमुख गल्लीमध्ये 'मालती निवासा'तील पहिल्या माळ्यावर छोट्याशा खोल्यांमध्ये आम्ही मायलेक राहात होतो. आर्थिक परिस्थिती पूर्णपणे खालावलेली. दारिद्र्याशी संघर्ष करणारी माझी अल्पशिक्षित आई आणि शिक्षणासाठी आसुसलेला; पण कोणतीच फी भरणे शक्य नसल्याने 'शाळेत कसा जाऊ?' असे प्रश्नचिन्ह घेऊन वावरणारा मी. त्यावेळचं वातावरण हे असं होतं!

पण माझ्या आईने धीर सोडला नाही. ती खचली नाही. वेगवेगळी कष्टाची कामं ती करीत होती. त्यातच माशेलहून मुंबईत आलेले माझे मामाही मदतीला आले. त्यांच्यामुळे मला खेतवाडीतील प्राथमिक शाळेत प्रवेश मिळू शकला. ही शाळा महापालिकेची होती. माझ्याप्रमाणेच शाळेचीही परिस्थिती बेताचीच होती; पण इथले शिक्षक मात्र मनानं खूप श्रीमंत होते. पायात चप्पलही घालायला नव्हती अशा परिस्थितीत माझी शाळा सुरू होती.

**(2) आकृती पूर्ण करा :** 2

डॉ. माशेलकर यांच्या माशेल गावातील आठवणी

| | |
|---|---|
| | |

**(3) शालेय विद्यार्थ्याच्या भूमिकेतील डॉ. माशेलकर यांचे तुम्हांला जाणवलेले गुणविशेष सोदाहरण लिहा.** 3

## अपठित गद्य

**प्र. 1. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

**(1) योग्य जोड्या लावा :** 2

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (i) सूर्य | (अ) पाणी |
| (ii) मेघ | (ब) वस्त्र |
| (iii) शेतकरी | (क) प्रकाश |
| (iv) विणकर | (ड) धान्य |

संयमाला तुच्छ मानू नका. तुमच्या विकासासाठी तो आहे. समाजाच्या हितासाठी तो आहे. आपण संयम पाळला नाही, तर आपले काम नीट होणार नाही. काम नीट झाले नाही म्हणजे समाजाचे नुकसान होणार. आपण केवळ आपल्या स्वत:साठी नाही. आपण समाजासाठी आहोत, याची जाणीव आपणांस हवी. हा आपला देह, हे आपले जीवन समाजाचे आहे. आपले पोषण सारी सृष्टी करीत आहे. सूर्य प्रकाश देत आहे, मेघ पाणी देत आहेत, वृक्ष फुले-फळे देत आहेत, शेतकरी धान्य देत आहे, विणकर वस्त्र देत आहे. आपण या सर्व सजीव-निर्जीव सृष्टीचे आभारी आहोत. यासाठी हे आपले जीवन त्यांच्या सेवेत अर्पण करणे हे आपले काम आहे.

**(2) एका शब्दात उत्तरे लिहा :** 2

(i) आपल्या विकासासाठी आवश्यक असलेला — --------------

(ii) आपले पोषण करणारी — --------------

## विभाग 2 : पद्य

**प्र. 2. (अ) कवितेच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

**(1) चौकटी पूर्ण करा :** 2

(i) मुळावर घाव घातले; तरी मुकाट सहन करणारे — [ ]

(ii) अलगद उतरणारे थेंब — [ ]

झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिराना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर पालवी
अन झटकली जाते मरगळ
पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचं
एक संथ गाणे दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळावं मुरावं कसं तर? झाडासारखं घट्ट पाय रोवीत
जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं
रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं!

**(2) आकृती पूर्ण करा :** **2**

| झाडाकडे टक लावून पाहिल्यानंतर घडणाऱ्या गोष्टी | |
|---|---|
| | |

**(3) प्रस्तुत कवितेतील पुढील शब्दांचा अर्थ लिहा :** **2**

(i) मुकाट —

(ii) मुसाफिर —

(iii) संथ —

(iv) मौन व्रत —

**(4) काव्यसौंदर्य :** **2**

'जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं' या ओळीतील अर्थसौंदर्य स्पष्ट करा.

**प्र. 2. (आ) पुढील दोन कवितांपैकी *कोणत्याही एका* कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा :**

| मुद्दे | 'अंकिला मी दास तुझा' | *किंवा* 'स्वप्न करू साकार' | |
|---|---|---|---|
| (1) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री — | | | (1) |
| (2) प्रस्तुत कवितेचा विषय — | | | (1) |
| (3) प्रस्तुत ओळीचा अर्थ लिहा — | 'अग्निमाजि पडे बाळू। माता धांवें कनवाळू।।' | 'हजार आम्ही एकी बळकट सर्वांचे हो एकच मनगट' | (2) |
| (4) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण — | | | (2) |
| (5) प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा — | (i) काज<br>(ii) सवें<br>(iii) पाडस<br>(iv) धेनू | (i) विभव<br>(ii) मंगल<br>(iii) श्रम<br>(iv) हस्त | (2) |

## विभाग 3 : स्थूलवाचन

**प्र. 3. पुढीलपैकी *कोणत्याही दोन* कृती लिहा :** **6**

**(1) टीप लिहा :** व्युत्पत्ती कोशाचे कार्य.

**(2)** 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते हे 'मोठे होत असलेल्या मुलांनो...' या पाठाच्या आधारे लिहा.

**(3)** 'थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस!' या विधानाची यथार्थता स्पष्ट करा.

## विभाग 4 : भाषाभ्यास

**प्र. 4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

**(1) पुढील वाक्यांचा प्रकार ओळखा :** **2**

(i) तुझ्या शाळेत मराठी दिन साजरा करतात का?

(ii) रनिंगपेक्षा देखील दोरीवरच्या उड्या मारा.

**(2) कंसांतील सूचनांनुसार वाक्यरूपांतर करा :** **2**

(i) नेहमी खरे बोलावे. *(नकारार्थी करा.)*

(ii) तुमची ऊर्जाशक्ती एकत्र करा. *(विधानार्थी करा.)*

**(3) पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा :** *(कोणतेही दोन)* **4**

(i) उत्साहाला उधाण येणे.

(ii) गलका करणे.

(iii) झोकून देणे.

**प्र. 4. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

**(1) शब्दसंपत्ती :**

**(i) पुढील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :** **1**

(1) पाऊस =

(2) मधुर =

**(ii) पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :** **1**

(1) सुरुवात ×

(2) स्तुती ×

**(iii) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा :** **1**

पायात चप्पल न घालता – [ ]

**(iv) वचन बदला :** **1**

(1) गोष्ट – ----------------

(2) कल्पना – ----------------

**(2) लेखननियमांनुसार लेखन :**

- **पुढील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा :** **2**

(1) कवीवर्य नारायण सुर्वे खुप सभा, संमेलने गाजवत.

(2) तीने माझ्यासाठी प्रंचड कष्ट केले.

**(3) विरामचिन्हे :**

- **पुढील वाक्यांत योग्य विरामचिन्हांचा उपयोग करा :** **2**

(1) अरे पण चिठ्ठी मराठीतून आहे.

(2) ''काका हे शास्त्रीय सत्य आहे''

## विभाग 5 : उपयोजित लेखन

**प्र. 5. (अ) पुढीलपैकी *कोणतीही एक* कृती सोडवा :**

**(1) पत्रलेखन :** 6

- **पुढील निवेदन वाचा व त्याखालील *कोणतीही एक* कृती सोडवा :**

**जीवनज्योती विद्यालय**
नांदगाव
कथाकथन स्पर्धा पारितोषिक
वितरण समारंभ

**दिनांक 22 जुलै**

**वेळ :** दुपारी 4 वाजता

**प्रमुख पाहुणे** : मा. श्री. अजय लागू
**अध्यक्ष** : मा. श्री. उत्तम कांबळे

**संपर्क :** jj22@gmail.com दीपक/दीपाली माने

**विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने**

पारितोषिकप्राप्त विद्यार्थी सुहास/सुनीता देसाई यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

***किंवा***

पारितोषिक वितरण समारंभासाठी अध्यक्ष म्हणून मा. उत्तम कांबळे यांना उपस्थित राहण्याची विनंती करणारे पत्र लिहा.

***किंवा***

**(2) सारांशलेखन :** 6

विभाग 1 – गद्य (इ) (प्र. क्र. 1 – इ) मधील अपठित उताऱ्याचा 1/3 एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. 5. (आ) पुढीलपैकी *कोणत्याही दोन* कृती सोडवा :**

**(1) जाहिरातलेखन :** 5

- **पुढील विषयावर जाहिरात तयार करा :**

शाळेतर्फे मे महिन्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या 'चित्रकला वर्गा'ची जाहिरात तयार करा.

**(2) बातमीलेखन :** 5

- **पुढील निवेदन वाचून बातमी तयार करा :**

**साने गुरुजी विद्यालय, सोलापूर**

भव्य वार्षिक क्रीडा महोत्सव संपन्न

दिनांक 13 जानेवारी

**वेळ :** सकाळी 8 वाजता

**प्रमुख पाहुणे :** मा. सौ. अपर्णा भोसले

**अध्यक्ष :** मा. श्री. रोहित बर्वे

इ. 5 वी ते 9 वीच्या सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग

✻ कवायतीचे प्रकार
✻ मल्लखांबाचे प्रकार
✻ लेझीम नृत्य
✻ क्रीडा साहित्यावर आधारित नृत्य प्रकार
✻ बक्षीस समारंभ

**(3) कथालेखन :** 5

- **पुढील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा :**


**मुद्दे :** आंतरशालेय क्रीडा स्पर्धा – धावण्याची स्पर्धा – शाळेतर्फे वरदचा सहभाग – वरद उत्तम धावपटू – सराव – उत्तम धावपटू तनयशी स्पर्धा – प्रत्यक्ष स्पर्धा – चुरशीची स्पर्धा – अचानक तनयचा पाय मुरगळणे – स्पर्धा सोडून वरदचे मदतीला धावणे – स्पर्धा हरूनही वरदचे कौतुक.

**प्र. 5. (इ) लेखनकौशल्य :**

- **पुढील लेखनप्रकारांपैकी *कोणतीही एक* कृती सोडवा :** 8


**(1) प्रसंगलेखन :**

- **पुढील मुद्द्यांच्या आधारे पावसाळ्यातील एका दिवसाचा तुम्ही घेतलेला अनुभव तुमच्या शब्दांत लिहा :**




**(2) आत्मकथन :**

- **दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा :**




**(3) वैचारिक लेखन :**

- **'युग संगणकाचे' या विषयावर पुढील मुद्द्यांच्या आधारे तुमचे विचार लिहा :**

काळाची गरज – महत्त्व – फायदे/तोटे – सदुपयोग.

# SOLUTION : BOARD'S ACTIVITY SHEET (MARCH 2020)

**प्र. 1. (अ)**

**(1)** (i) जनोबा रेगे

(ii) सोकाजी त्रिलोकेकर

**(2)**

**पंतांची आस्था वाढू लागलेले शब्द**

- प्रोटीनयुक्त पदार्थ
- चरबीयुक्त द्रव्ये

**(3)** वजन कमी करण्यासाठी पंतांनी डाएट करून उपास करण्याचे ठरवले; तेव्हा शेजाऱ्यापाजाऱ्यांनी व कचेरीतील सहकाऱ्यांनी पंतांना विविध सल्ले दिले. पंतांच्या चाळीतल्या सोकाजी त्रिलोकेकरांनी त्यांना बटाटा सोडण्याचा सल्ला दिला. एकाने भात सोडण्याचा सल्ला दिला; तर काशीनाथ नाडकर्णी म्हणाले – डाळ सोडा. कोणी साखर, मीठ आणि कोणी लोणी, तूप सोडायला सांगितले. बाबूकाकांनी पंतांना तेल व तळलेले पदार्थ सोडायला सांगितले. कोणी तर चक्क दिवसा झोपणे सोडा व पत्ते खेळणे सोडा, हेही सांगितले.

पंतांच्या कचेरीतील सहकाऱ्यांपैकी जगदाळेंनी रोज रनिंग करण्याचा, म्हणजे धावण्याचा सल्ला दिला; तर कुमारी कमलिनी केंकरे हिने दोरीवरच्या उड्या मारायला सांगितले. अशा प्रकारे पंतांच्या वजन कमी करण्याच्या निश्चयात अनेकांनी उत्साहाने विविध सल्ले दिले.

**प्र. 1. (आ)**

**(1)** (i) डॉ. माशेलकर यांना लहानपणीच 'माशेल' सोडावे लागले; कारण डॉ. माशेलकर सहा वर्षांचे असताना त्यांचे वडील वारले आणि उदरनिर्वाहासाठी त्यांना माशेल सोडावे लागले.

(ii) 'शाळेत कसा जाऊ?' असा प्रश्न माशेलकरांना पडला; कारण त्यांना शाळेची कोणतीच फी भरणे शक्य नव्हते.

**(2)**

**डॉ. माशेलकर यांच्या माशेल गावातील आठवणी**

- मैदानावर खेळल्याच्या
- पिंपळकट्ट्यावर बसून निवांतपणा अनुभवल्याच्या

**(3)** डॉ. माशेलकर यांनी शालेय शिक्षण फार गरिबीत पूर्ण केले. पायात घालायला चप्पलही नव्हती. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत त्यांना चपलेशिवाय राहावे लागले. वयाच्या सहाव्या वर्षी त्यांचे वडील वारले. त्यामुळे गाव सोडून ते व त्यांची आई खेतवाडीमध्ये लहानशा खोलीत राहिले. आर्थिक परिस्थिती वाईट व दारिद्र्याशी संघर्ष करणारी अल्पशिक्षित आई, अशा परिस्थितीत डॉ. माशेलकर शिक्षणासाठी आसुसलेले होते. आईची जिद्द व शिक्षकांचे मार्गदर्शन या बळावर माशेलकरांनी प्रगती केली. भिंगाच्या साहाय्याने सूर्यकिरणाची शक्ती कागदावर एकत्र केल्यास कागद जळतो. या प्रयोगातून माशेलकरांना एकाग्रतेचा मंत्र मिळाला आणि विज्ञान समजू लागले. संघर्षासाठी आत्मविश्वास बळावला. माशेलकरांना जगण्याचे भान आले. शाळा, शिक्षक व परमप्रिय आई हे त्यांचे 'संस्कार केंद्र' होते.

**प्र. 1. (इ)**

**(1)** (i) सूर्य — प्रकाश

(ii) मेघ — पाणी

(iii) शेतकरी — धान्य

(iv) विणकर — वस्त्र

**(2)** (i) संयम (ii) सृष्टी

**प्र. 2. (अ)**

**(1)** (i) झाड

(ii) दवाचे टपोरे थेंब

**(2)** **झाडाकडे टक लावून पाहिल्यानंतर घडणाऱ्या गोष्टी**

- शरीरभर हिरवा रंग विरघळतो.
- रक्त क्षणभर हिरवेगार होते.

**(3)** (i) मुकाट — मुक्याने, न बोलता

(ii) मुसाफिर — प्रवासी

(iii) संथ — सावकाश

(iv) मौन व्रत — न बोलण्याचा वसा

**(4)** 'हिरवंगार झाडासारखं' या कवितेत कवी जॉर्ज लोपीस सांगतात की, माणसाचे आयुष्य झाडासारखे व्हायला पाहिजे.

'झाड' हा निसर्गाचा एक घटक आहे. झाड सहनशील असते. ते परोपकारी असते. झाड नि:स्वार्थपणे माणसाला पाने, फुले, फळे देते. गाईगुरांसाठी, वाटसरूंसाठी दाट सावली देते. पशुपक्ष्यांना निवारा आणि माणसांना निवाऱ्यासाठी लाकूड देते. औषधही देते. त्याला निर्दयीपणे तोडणाऱ्या माणसाला ते दुखावत नाही; तर ते सहनशील राहून वेदना सोसते. झाडाचे हे सर्व सद्‌गुण माणसाने अंगिकारायला हवेत. पानगळीनंतर पालवी फुटलेले झाड माणसाच्या आयुष्याला प्रेरणा देते. म्हणूनच 'जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं' या पंक्तीतून 'माणसाने आपले आयुष्य झाडासारखे जगावे' हा बहुमोल संदेश कवी देतो.

**प्र. 2. (आ) अंकिला मी दास तुझा**

**(1) प्रस्तुत कवितेचे कवी** ⟶ संत नामदेव

**(2) प्रस्तुत कवितेचा विषय** ⟶ देवाला आई मानून, देवरूपी मातेने बाळाचा म्हणजेच आपला सांभाळ मायेने करावा, अशी विनवणी करणारा हा अभंग आहे.

**(3) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ** ⟶ जर समजा, आगीमध्ये बाळ चुकून पडला, तर दयाळू आई त्याचे रक्षण करण्यासाठी धावत जाते.

**(4) कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण** ⟶ या अभंगात संत नामदेव यांनी श्रीविठ्ठलाला आई संबोधून स्वत:चा सांभाळ करण्याची विनवणी केली आहे. हा अभंग वाचताना मला सतत माझ्या आईची आठवण झाली. आई किती जपते आपल्याला! देवानेही आईप्रमाणे आपल्यावर नित्य माया करावी, हा विचारच मनाला भावला. म्हणूनच मला हा अभंग खूप आवडला.

**(5) प्रस्तुत शब्दांचे अर्थ ⟶**

(i) काज – काम

(ii) सवें – लगेच, पटकन

(iii) पाडस – हरिणीचे पिल्लू

(iv) धेनू – गाय.

*किंवा*

**स्वप्न करू साकार**

**(1) प्रस्तुत कवितेचे कवी** ⟶ किशोर पाठक

**(2) प्रस्तुत कवितेचा विषय** ⟶ देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न या कवितेत रेखाटले आहे.

**(3) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ** ⟶ आम्ही भारतीय हजारो, लाखोंच्या संख्येने असलो, तरी आमची एकजूट मजबूत आहे. सर्वांची ताकद एकाच मनगटात आहे.

**(4) कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण** ⟶ या देशभक्तीपर गीतात नव्या पिढीचे व नव्या युगाचे स्वप्न साकार करण्यासाठी कवीने मार्गदर्शन केले आहे. हे करताना कृषिसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा, एकात्मतेचे सामर्थ्य या मूल्यांचा पुरस्कार केला आहे. नवीन पिढीसाठी नवी स्वप्ने साकार करण्याचा विचार मांडणारी ही कविता मला आवडली.

**(5) प्रस्तुत शब्दांचे अर्थ ⟶**

(i) विभव – वैभव, समृद्धी

(ii) मंगल – पवित्र

(iii) श्रम – मेहनत

(iv) हस्त – हात.

**प्र. 3.**

**(1) व्युत्पत्ती कोशाचे कार्य :** व्युत्पत्ती म्हणजे एखाद्या शब्दाच्या किंवा अर्थाच्या मुळाचे ज्ञान होय. व्युत्पत्ती सांगणे म्हणजे एखाद्या शब्दाच्या मुळाविषयी माहिती देणे होय. अशा अनेक शब्दांच्या व्युत्पत्तींचा संग्रह म्हणजे व्युत्पत्ती कोश!

व्युत्पत्ती कोशाचे कार्य पुढीलप्रमाणे चार प्रकारे चालते :

(१) मराठी भाषेतील – प्रमाण व बोली – शब्दांचे मूळ रूप दाखवणे.

(२) विशिष्ट प्रदेशात व भौगोलिक परिसरात एकाच शब्दातील उच्चारांत बदल होत असतो. हा शब्दाच्या उच्चारांतील बदल व फरक दाखवणे.

(३) भाषेमध्ये इतिहासाच्या दृष्टीने फरक होत असतात. भिन्न भिन्न काळात जे शब्दांत बदल होतात, त्या बदलांचे कारण स्पष्ट करणे.

(४) भिन्न भिन्न समाजात वेगवेगळ्या कारणांनी शब्दाच्या अर्थांच्या अंगानेही बदल संभवतात. हे अर्थांतील बदल स्पष्ट करणे.

**(2)** डॉ. होमी भाभा यांच्या मते, स्वत:च काम निर्माण करणे व काय काम करावे, हे स्वत:च ठरवणे हा सकारात्मक विचार प्रत्येकाने करायला हवा. बॉसने सांगितले तेवढेच काम करणे, ही चुकीची वृत्ती आहे. चिंता करीत न बसता, कामात गढून गेले की स्काय इज द लिमिट ही परिस्थिती निर्माण होते. कोणीतरी बोट धरून चालवेल, मार्ग दाखवेल ही स्थिती सुरुवातीला ठीक आहे. परंतु शेवटी स्वत:चे मार्ग स्वत: शोधणे, स्फूर्ती मिळवणे व कार्यात प्रवीण होणे हे ध्येय असावे. यालाच 'स्काय इज द लिमिट' असे म्हटले आहे.

**(3)** वाळवंटी प्रदेशाला 'मरुभूमी' म्हणजे जीवन संपवणारी भूमी म्हणतात. परंतु कधी काळी पाऊस आलाच तर वनस्पती त्याचा वापर कसा करतात हे पाहण्यासारखे आहे. पाऊस आला की उगवायचे आणि पाऊस संपला की बियांच्या रूपाने मातीत पडून राहायचे, हा इथल्या वनस्पतीचा नियम आहे. अवर्षणाचा प्रतिकार करणाऱ्या वनस्पतींमध्ये सर्वांत महत्त्वाचा प्रकार हा कॅक्टस आहे. कॅक्टस या वनस्पती पाऊस पडतो तेव्हा जेवढे पाणी मिळवता येईल तेवढे स्वत:मध्ये साठवून ठेवतात आणि कोरड्या हंगामात मंद गतीने वाढत राहतात. म्हणून 'थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस!' असे म्हटले जाते.

**प्र. 4. (अ)**

**(1)** (i) प्रश्नार्थी वाक्य

(ii) आज्ञार्थी वाक्य.

**(2)** (i) नकारार्थी वाक्य – कधीही खोटे बोलू नये.

(ii) विधानार्थी वाक्य – तुमची ऊर्जाशक्ती एकत्र करावी.

**(3)** (i) उत्साहाला उधाण येणे – **अर्थ :** मनात उत्साह उसळणे.

**वाक्य :** सुरुची वायंगणकरने बोर्डाच्या परीक्षेत 97.40 टक्के गुण मिळवल्यावर तिच्या वर्गात उत्साहाला उधाण आले.

(ii) गलका करणे – **अर्थ :** एकत्र येऊन आवाजाचा गोंधळ उडणे.

**वाक्य :** लॉकडाऊन शिथिल असण्याच्या वेळेत भाजीमंडईत लोक गलका करीत होते.

(iii) झोकून देणे – **अर्थ :** (कार्यात) समरस होणे.

**वाक्य :** छायाने शिकवणी वर्गाच्या अभ्यासात स्वत:ला झोकून दिले.

**प्र. 4. (आ)**

**(1)** **(i)** (1) पाऊस = पर्जन्य

(2) मधुर = गोड

**(ii)** (1) सुरुवात × शेवट

(2) स्तुती × निंदा

**(iii)** पायात चप्पल न घालता – अनवाणी

**(iv)** (1) गोष्ट – गोष्टी

(2) कल्पना – कल्पना

**(2)** (1) कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा, संमेलने गाजवत.

(2) तिने माझ्यासाठी प्रचंड कष्ट केले.

**(3)** (1) ''अरे, पण चिठ्ठी मराठीतून आहे.''

(2) ''काका, हे शास्त्रीय सत्य आहे.''

**प्र. 5. (अ), (आ), (इ)...**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तरे लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी ही उत्तरे स्वत: लिहावीत.

**'नवनीत सराव प्रश्नपत्रिका (कृतिपत्रिका)'** या पुस्तकात या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदान-पद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेली उत्तरे स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

**उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी**

***'नवनीत मराठी (LL) उपयोजित लेखन : इयत्ता दहावी'***

***या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.***

---

* * *

# MARATHI (LL)

## BOARD'S ACTIVITY SHEET (NOVEMBER 2020)

**(With Solution)**

**Time : 3 Hours]** **[Total Marks : 80**

**सूचना :** *(1) सूचनांनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.*

*(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.*

*(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.*

*(4) विभाग 5 – उपयोजित लेखन प्र. 5. (अ) (2) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र. 1. (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावा.*

*(5) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.*


---

## विभाग 1 : गद्य

### पठित गद्य

**प्र. 1. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

**(1) आकृतिबंध पूर्ण करा :** **2**




> पहिला दिवस सुरळीत गेला आणि दुसऱ्या दिवशी व्रतभंगाचा प्रसंग आला. पहिल्या दिवशी निम्म्याहून अधिक कचेरीला माझ्या वजन घटवण्याच्या व्रताची वार्ता गेली होती; परंतु दुसऱ्या दिवशी आमच्या अण्णा नाडगौडाला प्रमोशन मिळाल्याची वार्ता आली आणि त्याने साऱ्या सेक्शनला पार्टी दिली. कँटीनच्या आचाऱ्याने तर माझ्या 'डायट' वर सूड घ्यायचा असे ठरवून पदार्थ केले होते. बरे, न खावे तर अण्णा नाडगौडाला वाईट वाटणार! बिचारा सहा वर्षांनी 'एफिशिएन्सी बार'च्या जाळ्यातून बाहेर पडला होता. आचाऱ्याने मिठाईत साखर न घालता साखरेत मिठाई घालून आणली होती. घासाघासागणिक सहस्रावधी कॅलरीज पोटात चालल्या होत्या, त्यामुळे खाल्लेले गोड लागत नव्हते. बटाटेवडे होते – म्हणजे आणखी कॅलरीज. चिवडा अस्सल 'वनस्पती'तला, त्यामुळे आणखी कॅलरीज आणि एवढे सगळे हादडून शेवटी 'भज्यांशिवाय पार्टी कसली?' या भिकोबा मुसळ्याच्या टोमण्यामुळे चेकाळून नाडगौडाने स्पेशल भज्यांची परत ऑर्डर दिली.
>
> शेवटी मला राहवेना. भज्यांची सहावी प्लेट उडवल्यावर, मी अत्यंत केविलवाण्या स्वरात 'सध्या मी 'डाएट'वर असल्याचे' सांगितल्यावर सर्वांनी मला वेड्यात काढले.

**(2) कोण ते लिहा :** **2**

(i) सहा वर्षांनी 'एफिशिएन्सी बार'च्या जाळ्यातून बाहेर पडलेले – ------------------

(ii) 'भज्यांशिवाय पार्टी कसली?' असा टोमणा देणारे – ------------------

**(3) स्वमत :** 3

लेखकाला सर्वांनी वेड्यात काढण्याचे तुम्हांला समजलेले कारण सोदाहरण स्पष्ट करा.

**प्र. 1. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

**(1) चौकटी पूर्ण करा :** 2

(i) लेखकाच्या वडिलांची परत बदली झालेले ठिकाण — [ ]

(ii) लेखकाच्या खेळाबाबात स्तुतीपर उद्‌गार काढणारे — [ ]

(iii) व्हॉलीबॉल चॅम्पियन असणारे — [ ]

(iv) सहा रुपयांत विकत घेतलेली वस्तू — [ ]

माझ्या दृष्टीने एक आनंदाची गोष्ट म्हणजे माझ्या वडिलांची बदली परत पुण्यास झाली. माझ्या आई-वडिलांना वाय.एम.सी.ए. मधील खेळाडूंकडून माझ्या खेळाबाबात स्तुतीपर उद्‌गार ऐकू येऊ लागले, ते ऐकून त्यांना आनंद वाटे. माझे वडील स्वत: व्हॉलीबॉल चॅम्पियन होते. त्यामुळे ते मला खेळात नेहमीच प्रोत्साहन देत. एकदा दुपारी त्यांना जेवणाचा डबा घेऊन गेलो असताना त्यांनी मला दुकानात नेले व सहा रुपयांस एक जुनी बॅट विकत घेऊन दिली. ती बॅट पाहून माझा आनंद गगनात मावेना. मी तसाच ती बॅट घेऊन मित्रांना दाखवत सुटलो. त्या वेळेस वडिलांचा मासिक पगार अवघा चोवीस रुपये होता. माझे वडील अभ्यास व शाळा यांबाबतीत फारच कडक असत. एकदा मी शाळा चुकवून ग्राऊंडवर क्रिकेटचा एक मित्रत्वाचा सामना पाहत बसलो होतो. वडील घरी आले तेव्हा त्यांनी मला पाहिले व संतापाने छड्या मारत शाळेत नेऊन बसवले. त्या क्षणापासून मी शाळा मात्र कधीच चुकवली नाही.

**(2) का ते लिहा :** 2

(i) लेखकाचा आनंद गगनात मावेना; कारण — -------------------

(ii) लेखकाच्या वडिलांनी लेखकाला संतापाने छड्या मारत शाळेत नेऊन बसवले, कारण — ---------

**(3) स्वमत :** 3

लेखकाचे तुम्हांला जाणवलेले गुण सोदाहरण स्पष्ट करा.

## अपठित गद्य

**प्र. 1. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

**(1) उत्तरे लिहा :** 2

(i) विद्यार्थ्यांसमोर असलेले 'आदर्श' त्रिकोणाचे घटक लिहा.

(ii) योग्य शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमधले वाढीला लागणारे गुण लिहा.

शिक्षक हा विद्यार्थ्याला ज्ञानामृताचे कलश खुले करून देत असतो. शिक्षक-आई-वडील हाच खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांसमोरचा 'आदर्श' असा त्रिकोण आहे. मी तर याही पुढे जाऊन म्हणेन, की विद्यार्थ्यांचं आयुष्य घडवण्यासाठी जर फक्त पालक आणि शिक्षकांनी योग्य मार्गदर्शन केलं तर भारताचं चित्र काही वेगळंच दिसेल. असं म्हणतात, की पालकांच्या पाठीमागे शाळा आणि शिक्षकांच्या पाठीमागे घर उभे असते. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातल्या संबंधांना व्यावसायिक रूप न येता त्यांच्या संबंधामागे 'राष्ट्राची प्रगती' हा विचार हवा. योग्य शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमधले सभ्यपणा आणि स्वाभिमान हे गुण वाढीला लागतात. कुठलाही कायदा करून या गुणांचे संस्करण होत नाही तर ह्यांच्या वाढीसाठी केवळ योग्य संस्कारांचीच गरज असते आणि ते फक्त आपणच करू शकतो.

**(2) प्रश्न तयार करा :** 2

(i) 'राष्ट्राची प्रगती' हे उत्तर येईल, असा प्रश्न तयार करा.

(ii) 'शिक्षक' हे उत्तर येईल, असा प्रश्न तयार करा.

## विभाग 2 : पदय

**प्र. 2. (अ) कवितेच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

**(1) चौकटी पूर्ण करा :** 2

(i) अभंगात वर्णिलेला चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी – [ ]

(ii) पिलांना सुरक्षितता देणारे – [ ]

(iii) व्यक्तीला सदैव सुख देणारा – [ ]

(iv) वरवरचा मळ धुणारे – [ ]

**(2) आकृती पूर्ण करा :** 2

योगी पुरुष आणि जीवन (पाणी) यांच्यातील फरक स्पष्ट करा :

| योगी पुरुष | जीवन (पाणी) |
|---|---|
| | |

जेवीं चंद्रकिरण चकोरांसी। पांखोवा जेवीं पिलियांसी।
जीवन जैसे कां जीवांसी। तेवीं सर्वांसी मृदुत्व।।

जळ वरिवरी क्षाळी मळ। योगिया सबाह्य करी निर्मळ।
उदक सुखी करी एक वेळ। योगी सर्वकाळ सुखदाता।।

उदकाचें सुख तें किती। सवेंचि क्षणें तृषितें होती।
योगिया दे स्वानंदतृप्ती। सुखासी विकृती पैं नाही।।

उदकाची जे मधुरता। ते रसनेसीचि तत्त्वतां।
योगियांचे गोडपण पाहतां। होय निवविता सर्वेंद्रियां।।

मेघमुखें अध:पतन। उदकाचें देखोनि जाण।
अध:पातें निवती जन। अन्नदान सकळांसी।।

तैसे योगियासी खालुतें येणें। जे इहलोकीं जन्म पावणें।
जन निववी श्रवणकीर्तनें। निजज्ञानें उद्धरी।।

**(3) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा :** **2**

(i) उदक — --------------------

(ii) निजज्ञान — --------------------

(iii) निर्मळ — --------------------

(iv) सुखदाता — --------------------

**(4)** 'योगी पुरुष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे' हे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा. **2**

**प्र. 2. (आ) पुढील दोन कवितांपैकी *कोणत्याही एका* कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा :**

| मुद्दे | 'रंग मजेचे रंग उद्याचे' | *किंवा* 'हिरवंगार झाडासारखं' | |
|---|---|---|---|
| (1) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री — | | | (1) |
| (2) प्रस्तुत कवितेचा विषय — | | | (1) |
| (3) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश — | | | (2) |
| (4) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण — | | | (2) |
| (5) प्रस्तुत कवितेतील दिलेल्या शब्दांचा अर्थ लिहा — | (i) सृष्टी<br>(ii) वृष्टी<br>(iii) दौलत<br>(iv) तुष्टी | (i) बाहू<br>(ii) मुसाफिर<br>(iii) वस्त्र<br>(iv) मुकाट | (2) |

## विभाग 3 : स्थूलवाचन

**प्र. 3. पुढीलपैकी *कोणत्याही दोन* कृती लिहा :** **6**

**(1) टीप लिहा :** व्युत्पत्ती कोशाचे कार्य.

**(2)** तुम्हांला समजलेली 'जाता अस्ताला' या कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

**(3)** मेटलायझिंग प्रक्रियेवर लेखक डॉ. अनिल काकोडकर यांनी कसे काम केले ते तुमच्या शब्दांत लिहा.

## विभाग 4 : भाषाभ्यास

**प्र. 4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

**(1) पुढील वाक्यांचा प्रकार ओळखा :** **2**

(i) मस्ती करू नका.

(ii) तुम्ही काही झाडे लावली आहेत का?

**(2) कंसांतील सूचनांनुसार वाक्यरूपांतर करा :** **2**

(i) पांढरा रंग कोणाला आवडत नाही? *(विधानार्थी करा.)*

(ii) ताजमहालचे सौंदर्य अवर्णनीय आहे. *(उद्‌गारार्थी करा.)*

**(3) पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा :** *(कोणतेही दोन)* **4**

(i) कवेत घेणे

(ii) भान ठेवणे

(iii) झोकून देणे.

**प्र. 4. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

**(1) शब्दसंपत्ती :**

**(i) पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :** **1**

(1) मान ×

(2) स्वच्छ ×

**(ii) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा :** **1**

पायात चप्पल न घालता – ____________

**(iii) वचन ओळखा :** **1**

(1) फरशी – ----------------

(2) पिल्ले – ----------------

**(iv) लिंग बदला :** **1**

(1) वाघीण – ----------------

(2) पती – ----------------

**(2) लेखननियमांनुसार लेखन :**

- **लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा :** **2**

(1) जनमदिवस/जन्मदिवस/जन्मदीवस/जनमदीवस.

(2) अलंकार/आलंकार/आंलकार/आलंकर.

**(3) विरामचिन्हे :**

- **पुढील विरामचिन्हे ओळखून त्यांची योग्य नावे लिहा :** **2**

(1) ‘‘ ’’

(2) ,

(3) !

(4) ?

## विभाग 5 : उपयोजित लेखन

**प्र. 5. (अ) पुढीलपैकी *कोणतीही एक* कृती सोडवा :**

**(1) पत्रलेखन :** 6

- **पुढील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा :**

**शक्ती स्पोर्टस्**

मयूर कॉलनी, अकोला

सर्व शाळांसाठी 10% सवलतीच्या दरात खेळाचे साहित्य उपलब्ध.

**दुकानाची वेळ** — **सोमवारी बंद**

स. 10.00 ते रा. 8.00 — E-mail – shaktisports08@gmail.com

व्यवस्थापक

↓

अक्षय/अक्षदा चव्हाण
विद्यार्थी प्रतिनिधी –
न्यू इंग्लिश स्कूल,
अकोला या नात्याने

शाळेसाठी क्रीडासाहित्याची मागणी करणारे पत्र व्यवस्थापकांना लिहा.

← ***किंवा*** →

सवलतीच्या दरात खेळाचे साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल व्यवस्थापकांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

***किंवा***

**(2) सारांशलेखन :** 6

विभाग 1 – गद्य (इ) (प्र. क्र. 1 – इ) मधील अपठित उताऱ्याचा 1/3 एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. 5. (आ) पुढीलपैकी *कोणत्याही दोन* कृती सोडवा :**

**(1) जाहिरातलेखन :** 5

- **पुढील मुद्दे लक्षात घेऊन जाहिरात तयार करा :**

शालेय साहित्याच्या दुकानाची आकर्षक जाहिरात तयार करा.

**मुद्दे** – दुकानाचे नाव, वैशिष्ट्ये, पत्ता

**(2) बातमीलेखन :** 5

- **पुढील विषयावर बातमी तयार करा :**

> **जीवनज्योत विद्यालय, पिंपरी**
>
> येथे मराठी निबंधलेखनाची कार्यशाळा संपन्न.
>
> तज्ज्ञ मार्गदर्शक – श्रीमती मधुरा महाजन
>
> दि. 16 डिसेंबर वेळ – 10.00 ते 5.00

**(3) कथालेखन :** 5

- **पुढील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा :**

**मुद्दे :** उंट व कोल्हा मित्र – पाणी पिण्यासाठी नदीवर जाणे – नदी पलीकडील उसाचे शेत पाहून खाण्याची इच्छा – उंटाचे कोल्ह्याला पाठीवर बसवून नदी पार करणे – लवकर पोट भरल्याने कोल्ह्याचे ओरडणे – उंटाची न ओरडण्याबद्दल विनंती – शेताचा मालक धावत येणे – कोल्ह्याचे पळून जाणे – उंटाला मार – परत येताना उंटाचे पाण्यात बसणे – कोल्ह्याची न बसण्याची विनंती – परिणाम.

**प्र. 5. (इ) लेखनकौशल्य :**

- **पुढील लेखनप्रकारांपैकी *कोणतीही एक* कृती सोडवा :** 8


**(1) प्रसंगलेखन :**

पावसापूर्वीचे वातावरण – वातावरणात झालेला अचानक बदल – पावसाला सुरुवात – जनजीवनावर परिणाम – अविस्मरणीय अनुभव

**वरील मुद्दे विचारात घेऊन ‘अकस्मात पडलेला पाऊस’ या विषयावर प्रसंगलेखन करा.**

**(2) आत्मकथन :**

- **दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा :**




**(3) वैचारिक लेखन :**

- **‘वर्तमानपत्राचे महत्त्व’ या विषयावर तुमचे विचार लिहा.**

---

# SOLUTION : BOARD'S ACTIVITY SHEET (NOVEMBER 2020)

**प्र. 1. (अ)**

**(1)**

**नाडगौडाच्या पार्टीत असलेले पदार्थ**

- मिठाई
- बटाटेवडे
- चिवडा
- भजी

**(2)** (i) अण्णा नाडगौडा

(ii) भिकोबा मुसळे

**(3)** वजन वाढल्यामुळे लेखकांनी दोन महिन्यांत पन्नास पौंड वजन कमी करण्याची 'भीष्मप्रतिज्ञा' केली. त्यांच्या खाजगी उपोषणाची कहाणी चाळीत सर्वत्र गाजली. त्यामुळे चाळकऱ्यांनी त्यांना डाएटचे विविध सल्ले देऊ केले. झोप कमी झाली की वजन उतरते या विचारावर लेखकांच्या पत्नीनेच 'रात्रभर घोरत असता' असे म्हणत त्यांना वेड्यात काढले. लेखकांचे उपोषण हे 'नाही ती भानगड आहे', 'हात दाखवून अवलक्षण आहे', 'पेलले नाही तेव्हा खाजगी झाले' असे शेरे चाळीतल्या लोकांनी मारले. मनाचा ठाम निश्चय व जिभेवरचा ताबा याने वजन कमी होत नाही, या कारणामुळे लेखकांची थट्टा सर्वांनी केली.

**प्र. 1. (आ)**

**(1)** (i) पुणे

(ii) वाय एम सी. ए. मधील खेळाडू

(iii) लेखकाचे वडील

(iv) जुनी बॅट

**(2)** (i) लेखकाचा आनंद गगनात मावेना; कारण वडिलांनी लेखकाला एक जुनी बॅट विकत घेऊन दिली.

(ii) लेखकाच्या वडिलांनी लेखकाला संतापाने छड्या मारत शाळेत नेऊन बसवले; कारण लेखक शाळा चुकवून क्रिकेटचा एक मित्रत्वाचा सामना बघत बसले होते.

**(3)** कोणत्याही घरातील लहान मुलांप्रमाणेच लेखकही लहानपणी खेळकर, खोडकर होते. लेखकाचे कुटुंब गरीब होते. त्यामुळे गरिबीमुळे येणारी दु:खे त्यांनीही भोगली. तसेच कष्टही उपसले. यावरून ते सहनशील व कष्टाळू होते हे जाणवते. खेळणी विकत घेता येत नसल्यामुळे दुसऱ्यांच्या हातातली खेळणी पाहून ते हिरमुसले व्हायचे. तरीही त्या खोडकर वयात ते भर उन्हात विटीदांडू खेळायचे, पतंग उडवायचे, चोरून पोहायचे व कैऱ्या, पेरू खाऊन मजा करायचे. यावरून आहे त्या परिस्थितीत त्यांचा स्वभाव आनंददायी होता. बॅट, स्टंप स्वत: तयार करून दिवसभर ते खेळायचे. यावरून लहानपणी त्यांना क्रिकेट खेळात रस व ओढ होती, हे दिसून येते.

**प्र. 1. (इ)**

**(1)** (i) शिक्षक, आई, वडील

(ii) सभ्यपणा आणि स्वाभिमान

**(2)** (i) विद्यार्थी व शिक्षक यांच्या संबंधांमागे कोणता विचार असावा?

(ii) ज्ञानामृताचे कलश खुले करून देणारा कोण असतो?

**प्र. 2. (अ)**

**(1)** (i) चकोर

(ii) पांखोवा/पक्षिणीचे पंख

(iii) योगी पुरुष

(iv) उदक/पाणी/जळ/जल

**(2)**

| योगी पुरुष | जीवन (पाणी) |
|---|---|
| (i) सबाह्य निर्मळ करतो. | वरवरचा मळ धुते. |
| (ii) स्वानंदतृप्ती देतो. | तहान शमवणारे क्षणाचे सुख देते. |
| (iii) सर्व इंद्रियांना शांत करतो. | फक्त जिभेला तृप्त करते. |
| (iv) आत्मज्ञानाने उद्धार करतो. | फक्त अन्नदान करते. |

(**नोंद :** फरकाचे कोणतेही दोन मुद्दे लिहावेत.)

**(3)** (i) उदक — पाणी

(ii) निजज्ञान — स्वत:ला झालेले ज्ञान

(iii) निर्मळ — स्वच्छ

(iv) सुखदाता — सुख देणारा

**(4)** संत एकनाथ महाराजांनी योगी पुरुष व पाणी यांची प्रस्तुत अभंगात तुलना केली आहे आणि योगी पुरुषाचे श्रेष्ठत्व ठसवले आहे. योगी पुरुष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे, हे सांगताना ते म्हणतात — पाणी हे वरवरचा मळ धुवून टाकते; परंतु योगी सर्व लोकांचे मन आतून-बाहेरून निर्मळ करतो. पाणी एका वेळची तहान भागवते; परंतु योगी पुरुष हा सर्वांसाठी सर्व काळांमध्ये सुख देणारा सज्जन आहे. पाण्याचे सुख तात्पुरते आहे. पण योग्याने दिलेल्या सुखात विकृती नाही. योगी पुरुष सर्वांना अक्षय परमानंद देतो. पाण्याची गोडी फक्त जिभेपुरती मर्यादित असते. परंतु योग्याच्या आत्मज्ञानाची गोडी सर्व लोकांच्या सर्व इंद्रियांना शांत करते. पाण्याने माणसाची पोटाची भूक भागते; परंतु योगी पुरुष श्रवणकीर्तनाने माणसांच्या मनाचे पोषण करतो.

अशा प्रकारे 'योगी पुरुष हा पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे' हे संत एकनाथांनी अनेक उदाहरणांनी पटवून दिले आहे.

**प्र. 2. (आ) रंग मजेचे रंग उद्याचे**

**(1) प्रस्तुत कवितेच्या कवयित्री** ⟶ अंजली कुलकर्णी.

**(2) प्रस्तुत कवितेचा विषय** ⟶ 'रंग मजेचे, रंग उद्याचे' या कवितेतून कवयित्रींनी संगणक युगातही निसर्गाची दौलत जोपासायला हवी, हे सुंदर शब्दांत सांगितले आहे.

**(3) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश ⟶**

'रंग मजेचे, रंग उद्याचे' या कवितेमध्ये कवयित्री अंजली कुलकर्णी यांनी यंत्रयुगातही पर्यावरण सुंदर ठेवावे, म्हणजे मानवी मनेही समृद्ध होतात हा संदेश दिला आहे. मानवाने पर्यावरणाची काळजी घेतली पाहिजे. निसर्गाशी एकरूप होऊन जगण्यातच खरा आनंद आहे, हा महत्त्वाचा संदेश ही कविता देते.

**(4) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण ⟶**

यंत्राच्या, संगणकाच्या युगामध्ये निसर्गप्रेमाचे महत्त्व सांगणारी ही कविता मला खूपच आवडली. कारण यंत्रयुगात पर्यावरणाचा झपाट्याने नाश होत आहे. पर्यावरणाची होणारी हानी थांबवून, पर्यावरणाचे रक्षण आपण केले पाहिजे. तरच निसर्गाच्या विविध मनोहारी सौंदर्यात जगण्याचा मनस्वी आनंद आपणांस मिळू शकेल.

**(5) प्रस्तुत शब्दांचे अर्थ ⟶**

(i) सृष्टी – जग
(ii) वृष्टी – वर्षाव
(iii) दौलत – संपत्ती
(iv) तुष्टी – समाधान/तृप्ती

***किंवा***

**हिरवंगार झाडासारखं**

**(1) प्रस्तुत कवितेचे कवी ⟶** जॉर्ज लोपीस.

**(2) प्रस्तुत कवितेचा विषय ⟶** माणसाने आपले आयुष्य झाडासारखे जगावे, हे सूत्र या कवितेतून मांडले आहे.

**(3) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश ⟶**

कवी जॉर्ज लोपीस यांची मुक्तछंदात लिहिलेली ही कविता आहे. झाडाचे महत्त्व, झाडाची सहनशीलता, परोपकारी वृत्ती, संकटात ठाम उभे राहण्याची जिद्द या गुणांचे महत्त्व या कवितेतून जाणवते. माणसाने झाडासारखे प्रसन्न व हिरवेगार असावे अशी शिकवण ही कविता देते.

**(4) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण ⟶**

'झाड' हा निसर्गाचा एक घटक आहे. झाडाची परोपकारी वृत्ती, अविचल वृत्ती, दानशूरता, आनंदी वृत्ती हे गुण मानवाने घ्यावेत, असे ही कविता सांगते. विविध गुणांनी संपन्न असलेल्या वृक्षासारखे तुम्ही व्हा, हे सहजपणे सांगणारी ही कविता मला आवडते. सोपेपणाने शिकवण देण्याची ताकद या कवितेमध्ये आहे.

**(5) प्रस्तुत शब्दांचे अर्थ ⟶**

(i) बाहू – हात
(ii) मुसाफिर – प्रवासी
(iii) वस्त्र – कपडा
(iv) मुकाट – गप्प

**प्र. 3.**

**(1) व्युत्पत्ती कोशाचे कार्य :** व्युत्पत्ती म्हणजे एखाद्या शब्दाच्या किंवा अर्थाच्या मुळाचे ज्ञान होय. व्युत्पत्ती सांगणे म्हणजे एखाद्या शब्दाच्या मुळाविषयी माहिती देणे होय. अशा अनेक शब्दांच्या व्युत्पत्तींचा संग्रह म्हणजे व्युत्पत्ती कोश!

व्युत्पत्ती कोशाचे कार्य पुढीलप्रमाणे चार प्रकारे चालते :

(१) मराठी भाषेतील – प्रमाण व बोली – शब्दांचे मूळ रूप दाखवणे.

(२) विशिष्ट प्रदेशात व भौगोलिक परिसरात एकाच शब्दातील उच्चारांत बदल होत असतो. हा शब्दांच्या उच्चारांतील बदल व फरक दाखवणे.

(३) भाषेमध्ये इतिहासाच्या दृष्टीने फरक होत असतात. भिन्न भिन्न काळात जे शब्दांत बदल होतात, त्या बदलांचे कारण स्पष्ट करणे.

(४) भिन्न भिन्न समाजांत वेगवेगळ्या कारणांनी शब्दाच्या अर्थांच्या अंगानेही बदल संभवतात. हे अर्थांतील बदल स्पष्ट करणे.

**(2)** सूर्य दररोज उगवतो. सर्व जगाला, सर्व सृष्टीला, चराचराला प्रकाश देतो, ऊर्जा देतो, चैतन्य देतो. पृथ्वीला तेज देण्याचे कार्य तो अखंडपणे पार पाडतो. तो जेव्हा मावळायला जातो, तेव्हा त्याच्या मनात एक खंत कायम असते की, मी गेल्यावर या धरतीची काळजी कोण घेईल? पृथ्वी सारी अंधारात बुडेल, तेव्हा तिला माझ्यासारखे कोण उजळेल? या विचाराने सूर्याचे डोळे अश्रूंनी भरतात. गुरुदेव टागोरांनी या कवितेत सूर्याचे पृथ्वीवर असलेले प्रेम आर्त शब्दांत व्यक्त केले आहे. या कवितेतून सूर्याची आईच्या प्रेमळपणाची व मायेची भूमिका प्रकट होते.

**(3)** बार्कमध्ये लेखक इंजिनियर म्हणून रुजू झाले, तेव्हा त्यांना मेटलायझिंग प्रक्रियेवर काम करायला सांगण्यात आले. त्या प्रसंगातून आपल्याला मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्याची कारणे कळतात. तिथे सगळी यंत्रसामग्री असली, तरी कोणी वापरत नाही. इंजिनियरला वेल्डर व फोरमन लागतात. परंतु आता काहीच मदत मिळणार नाही, असे त्यांना सांगण्यात येते. त्यामुळे कुणाचीही मदत न घेता इंजिनियरला आधी सर्व कामे करायला लागतात. स्वत: सगळी कामे इंजिनियरला आली, तर मग त्याला इतर माणसे हाताखाली मिळतील आणि ते आनंदाने काम करतील. आपल्याला येत नसताना दुसऱ्याला काम सांगणे योग्य नाही. प्रथम आपण काम करायचे मग इतरांना सांगायचे, हे घडत नसल्यामुळे मेटलायझिंग प्रक्रियेवर काम होत नाही.

**प्र. 4. (अ)**

**(1)** (i) आज्ञार्थी वाक्य

(ii) प्रश्नार्थी वाक्य.

**(2)** (i) विधानार्थी वाक्य – पांढरा रंग सर्वांना आवडतो.

(ii) उद्‌गारार्थी वाक्य – किती अवर्णनीय आहे ताजमहालचे सौंदर्य!

**(3)** (i) कवेत घेणे – **अर्थ :** मिठीत घेणे.

**वाक्य :** नोकरीवरून आल्यावर आईने लगेच बाळाला <u>कवेत घेतले.</u>

(ii) भान ठेवणे – **अर्थ :** जाणीव ठेवणे.

**वाक्य :** गरीब परिस्थितीत मोठ्या भावाने मदत केल्याचे बहिणीने <u>भान ठेवले.</u>

(iii) झोकून देणे – **अर्थ :** पूर्णपणे सहभागी होणे.

**वाक्य :** सेवानिवृत्त झाल्यावर विठ्ठलरावांनी स्वत:ला समाजकार्यात <u>झोकून दिले.</u>

**प्र. 4. (आ)**

**(1)** **(i)** (1) मान × अपमान

(2) स्वच्छ × अस्वच्छ

**(ii)** पायात चप्पल न घालता – अनवाणी

**(iii)** (1) फरशी – एकवचन

(2) पिल्ले – अनेकवचन

**(iv)** (1) वाघीण – वाघ

(2) पती – पत्नी

**(2)** (1) जन्मदिवस

(2) अलंकार

**(3)** (1) ''   '' – दुहेरी अवतरणचिन्ह

(2) ,  – स्वल्पविराम

(3) !  – उद्‌गारवाचकचिन्ह

(4) ?  – प्रश्नचिन्ह

**प्र. 5. (अ), (आ), (इ)...**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तरे लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी ही उत्तरे स्वत: लिहावीत.

**'नवनीत सराव प्रश्नपत्रिका (कृतिपत्रिका)'** या पुस्तकात या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदान-पद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेली उत्तरे स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

**उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी**

***'नवनीत मराठी (LL) उपयोजित लेखन : इयत्ता दहावी'***

***या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.***

---

* * *